| | |
|---|---|
| | **पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१,**<br>**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**<br>**पत्ता- प्रिमियर कंपनीच्या शेजारी,**<br>**जुना पुणे-मुंबई रस्ता, चिंचवड, पुणे १९** |

**प्रेस नोट**

**दिनांक - ०७/०६/२०२२**

**रिक्षाचा कट मारल्याचे कारणावरुन झालेल्या वादात सराईत गुंडाने मध्यस्थी करुन धमकावल्याचा बदला घेणे करीता सराईत गुन्हेगार समजुन त्याचे भावावर बंदुकीतुन फायर करुन जिवघेणा हल्ला दोघांना बेडया ठोकण्यात महाळुंगे पोलीसांना यश : तिन फरार आरोपींचा शोध चालु.**

---

दि-०१/०६/२०२२ रोजी सायंकाळी मौजे-महाळुंगे, ता खेड जि पुणे येथील सराईत गुंड अजय अरुण गायकवाड याचा मित्र संभाजी मोहन यमुनवाड याने त्यांचे विरुध्द पार्टीचे सदस्य सोन्या जावळे याचे ड्रायव्हरला रिक्षाचा कट मारल्याने झालेल्या वादामध्ये सराईत गुंड अजय गायकवाड याचा मित्र संभाजी यमुनवाड याने सोन्या जावळे व राहुल फलके यांना मारहान केली. तसेच सराईत गुंड अजय गायकवाड याने धमकावल्याचे कारणावरुन राहुल बाळासाहेब फलके याने त्याचे मित्रांसह संगणमत करुन गुंड अजय गायकवाड यास अद्दल घडवण्याचे ठरविले.

दि-०२/०६/२०२२ रोजी रात्रौ ११:३० वा चे सुमारास सराईत गुंड अजय गायकवाड हा वापरत असलेल्या कारमधुन त्याचा भाऊ वैभव गायकवाड हा घरी जात असताना त्यास अजय समजुन राहुल फलके व त्याचे साथीदारांनी जिवे मारण्याचे उद्देशाने हल्ला चढवुन वैभव गायकवाड याचे दिशेने बंदुकीतुन एक गोळी फायर केली असता वैभव गायकवाड याचे पाठीमागुन मोटार सायकलीवर येत असलेल्या संभाजी यमुनवाड याने, वैभ्या पळ असा आवाज दिल्याने हल्लेखोर राहुल फलके व त्याचे साथीदारांना अजय गायकवाड नसल्याचे लक्षात आल्यावर ते कारगाडी मधुन फरार झाले.

सदर घटनेच्या अनुषंगाने सराईत गुंडाचा भाऊ वैभव अरुण गायकवाड याने दिलेल्या तक्रारीवरुन चाकण पोलीस स्टेशन अंकित महाळुंगे पोलीस चौकी येथे **गुन्हा रजि.नंबर ८८१/२०२२ भा.द.वि.कलम ३०७, १४१, १४३, १४८, १४९, आर्म ॲक्ट कलम ३, २५ सह क्रिमिनल अमेंटमेंट ॲक्ट कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मा.पोलीस आयुक्त श्री.अंकुश शिंदे साहेब यांनी गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने सुचना व मार्गदर्शन केल्याने महाळुंगे पोलीस चौकीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.अरविंद पवार** यांनी घटनास्थळी भेट देवुन फरार आरोपींचे शोधा करीता ३ पथके तयार करुन रवाना केले. पोलीस उपनिरीक्षक श्री विलास गोसावी व पोलीस स्टाफने राजगुरुनगर (खेड) येथुन दोघांना ताब्यात घेतले असुन इतर तिघांचा शोध चालु आहे.

**अटक आरोपीचे नाव –**

**१) राहुल बाळासाहेब फलके, वय २८ वर्ष,** रा-महाळुंगे, ता खेड जि पुणे
**२) अंकित अर्जुन थोरात, वय २८ वर्ष,** रा-चाडोली बुद्रुक, ता - आंबेगाव, जि पुणे.
सदर आरोपींची मा.न्यायालयकडुन दि ०९/०६/२०२२ पर्यत पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.अंकुश शिंदे**, मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.संजय शिंदे**, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ **श्री मंचक इप्पर**, सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग **श्री.सागर कवडे**, वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.अरविंद पवार** यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक(गुन्हे) **दशरथ वाघमोडे**, सहा.पोलीस निरीक्षक **दत्तात्रय गुळीग**, पोलीस अंमलदार- **गोरक थेऊरकर, राजु कोणकेरी, अमोल बोराटे, विठ्ठल वडेकर, युवराज बिराजदार, तानाजी गाडे, किशोर सांगळे, संतोष काळे, शिवाजी लोखंडे, शरद खैरे, बाळकृष्ण पाटोळे,** यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक **विलास गोसावी** हे करीत आहेत.

( मंचक इप्पर )
पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १
पिंपरी चिंचवड शहर